# आभाळ लेणं

- व्यंकटेश वळसंगकर

2499




REFBK-0024345
REFBK-0024345

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

# आभाळ लेणं

प्रा. व्यंकटेश वळसंगकर

REFBK-0024345
REFBK-0024345



चंद्रकांत शेटचे प्रकाशन मंदिर

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती
मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित

कवी केशवकुमार
तथा
आचार्य अत्रे
यांच्या
८६ व्या
जयंती निमित्त प्रकाशित

आवृत्ती पहिली
१३ ऑगस्ट १९८४

©
प्रा. व्यंकटेश वळसगकर
रत्नदीप
१०/२७४ खालची आळी
ब्रह्मपूर, गुलबर्गा ३ (कर्नाटक)

प्रकाशक
चंद्रकांत शेटये

प्रकाशन स्थळ
अत्रे सभागृह
शिवाजी रस्ता
कोल्हापूर-४१६००२

मुद्रक
रामचंद्र डी. खाडे
गंगा प्रिंटिंग प्रेस
सोमवार पेठ
कोल्हापूर-४१६००२

संदर्भ काव्य
२५११
२८३८५
१५१०।८४

' मोठा हो बाळ ! '

असा आशीर्वाद देणारे

माझे

स्वर्गस्थ आजोबा

अण्णा तथा नरहरपंत वळसंगकर

यांचे

पवित्र स्मृतीस—

# 'आभाळ लेण्या'चा आगळेपणा

श्री. व्यंकटेश वळसंगकर हे गेले अर्धा तप मराठी साहित्य-क्षेत्रात विविधप्रकारचे काव्यलेखन करून, आता आपले 'आभाळ लेणे' घेऊन रसिकांच्या भेटीस येत आहेत. गुलबर्ग्यासारख्या थोड्या दूरच्या ठिकाणी राहूनही ते मराठी काव्यक्षेत्रात जी आगळी वेगळी भर टाकीत आहेत ती-बद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करावयास हवे.

श्री. वळसंगकर हे वाङमयाचे गाढे उपासक, अभ्यासक व काव्याचे खरे प्रेमी आहेत. काव्य हा त्यांचा निष्ठेचा व जिव्हाळ्याचा विषय आहे. मराठीतील विविध नियतकालिकांनी व दिवाळी अंकांनी त्यांच्या कवितांना यापूर्वीच प्रसिद्धी देऊन रसिकमान्यतेची पावती दिली आहे. त्यांच्या काही कवितांनी विविध स्पर्धांतून पारितोषिकेही पटकावली आहेत. या संग्रहातील कविता आपल्या अनोख्या शैलीने व चमकदारपणाने रसिकांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतील यात शंका नाही.

आशय व आविष्कार यातील वेगळेपणा व नजाकत यांमुळे वळसंगकरांच्या साऱ्याच काव्यरचनेवर अंतःसौंदर्याचा एक आगळा साज चढला आहे असेच कोणीही रसिक म्हणेल.

जीवनातील विविध मर्मस्पर्शी विषयांबरोबर दिव्यप्रेमाची सहज सुंदर चित्रेही या संग्रहात अनेक आढळतात. सफल व विफल प्रीतीचे रंग ही कविता 'हृदयाच्या अंतर्हृदयापर्यंत' सहज नेऊन पोचविते.

तुझा चंद्र । माझा चंद्र
निळे चांदणे । दोघांचे ॥
तुझे शब्द । माझे शब्द
एकच गीत । दोघांचे... ॥ (गीत)

अशा ओळी रसिकांच्या मनात नित्य सहकंप निर्माण करणाऱ्या आहेत. 'पहाट', 'ती', किंवा 'फुले खुडताना' किंवा 'मागू नकोस' अशा कविता आकाराने छोट्या असल्या तरी आशय दृष्ट्या चमकदार आहेत व

कवित्वाच्या अनमोल स्पर्शाने कशा आत बाहेर उजळून गेल्या आहेत !

वळसंगकर यांच्या कवितेचा घाट तिचा स्वतःचा, इतरांहून वेगळा आहे. तो शब्दाशब्दांतून भावनेची स्पंदने जागविणारा आहे. एका ओळीत एकेकच शब्द लिहीत वळसंगकर कविता रचतात तेव्हा ती, व्यक्त शब्दांपेक्षा अव्यक्त आणि उत्कट अनुभवच जास्त सांगत राहते– असे जाणवते, हेच तिचे वैशिष्टच होय. 'सुंदर खाशी सुबक ठेंगणी' अशी भावमूर्ती म्हणजे वळसंगकरांची कविता. 'ज्योत' सारखी कविता या दृष्टीने उद्धृत करण्यासारखी आहे. ते लिहितात :

दुःखाचा वेध
सुखाचा शोध
पाऊलवाट वळून
दूर निघून गेलेली...
रस्त्यावर
एक घर
पावलं तिथेच
थबकलेली...
काळीज घरात
एक मिणमिण ज्योत
तुझ्या हाताने सावरलेली...

आजच्या यांत्रिक व तांत्रिक जीवनात, जीवनमूल्येच हरवून बसावे लागलेल्यांना वळसंगकरांच्या 'पाझर' सारख्या कविता जिवलग मित्रासारखा दिलासा देतील, पणतीला तेलवात पुरवीत राहतील असा विश्वास वाटतो.

येथील काही कवितांचा प्रारंभ तर काही कवितांचा शेवट हा आंतरिक लयीच्या दृष्टीने फारच प्रभावी वाटतो. 'शब्दांच्या पलिकडले' काही दृश्यादृश्यभाव रेखाटण्याचा कवीचा यत्न दिसतो.

व्यथा, वेदना, विफलता पचवूनही कवीची जीवनदृष्टी विकृत झालेली नाही किंवा तिरकसही बनलेली नाही. यामुळेच ही कविता

ठराविक आवर्तात किंवा आवर्तनात गुरफटून रहात नाही. सामाजिक जाणिवेची व दुःख-दैन्याची तारही हा कवी प्रभावीपणे छेडू शकतो हे, ' हे शहर ', ' आम्ही ', ' चांदणं ' अशा कवितांतून प्रत्ययास येते.

गगनभर चांदण्या पेरल्यानंतरही
चंद्र आमचा असत नाही
चांदणे आमचे असत नाही...
लाख सूर्य तेज पाजळताना
अंगातून धार निथळताना
गळाभरचं दुःख पुसून टाकता येत नाही...

अशी कविवचने मोठी लक्षणीय वाटतात.

कवीच्या खास आत्मनिष्ठ म्हणाव्या अशा कविताही विशेष उल्लेखनीय आहेत. तो स्वतःच्या भावजीवनाकडे समरसून पाहू शकतो. स्वतःचे सुखदुःख सहज पेलू शकतो व आपल्या संवेदना यथार्थरीत्या शब्दांकित करू शकतो. वळसंगकरांना कविता अनेक वाटांनी येऊन भेटलेली आहे; व त्यांनी ' ओघळणाऱ्या अश्रूंना ' व ' मनातल्या व्यथांना ' साक्षी ठेवून तिची साथ संगत मनात व जनात चांगली सांभाळली आहे.

अल्पाक्षरी पण जीवनातले मर्म व वर्म बरोबर हेरणारी ही कविता वाचताना एक उमदे, उत्साही व आत्मजागृत कविमन आपणाला सतत भेटत राहते विविध भाव भावनांचा आणि आशा निराशांचा बहुरंगी साज मिरवणारे हे ' आभाळ लेणं ' वळसंगकरांना भविष्याचे महाद्वार उघडून देत आहे. या नव्या शारदेच्या पायिकाचे मराठीच्या दरबारात स्वागत असो.

६१।४८, एरंडवणे,
पुणे–४

–डॉ. वि. म. कुलकर्णी

# अभिनंदन

श्री. व्यंकटेश वळसंगकर यांच्या काही कवितांचा एक छोटासा संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे हे ऐकून अतिशय आनंद झाला. खरं तर हा योग यापूर्वीच यायला हवा होता. पण आपले मनोरथ अन् सिद्धी यामध्ये पुष्कळदा एक मोठी दरी पसरलेली असते. श्री. वळसंगकरांच्या बाबतीत इतके दिवस अशीच एक दरी पसरलेली होती. ती उल्लंघून ' आभाळ लेणं ' हा त्यांचा पहिला वहिला काव्यसंग्रह ते रसिकांच्या हाती देत आहेत ही अत्यंत स्वागतार्ह अशी घटना आहे. त्यांचे हार्दिक अभिनंदन !

एका संग्रहाच्या माध्यमातून श्री. व्यंकटेश वळसंगकर प्रथमच कवी म्हणून महाराष्ट्र शारदेच्या मंदिरात प्रवेश करीत असले तरी काव्यदेवतेची त्यांची आराधना तशी अनेक वर्षांपासून चाललेली आहे. त्यांच्या विद्यार्थी दशेपासूनच त्यांना कवी म्हणून मी ओळखतो. लहानपणापासूनच चित्रकला, काव्यरचना हे त्यांचे आवडते छंद असल्याचे मी जाणतो. परिस्थितीची फारशी अनुकूलता नसताही हे छंद त्यांनी जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक जोपासले हे त्यांचे वैशिष्टच ' दिमामाजी काहीतरी लिहावे ' हा समर्थांचा उपदेश आचरणांत आणण्याची त्यांची चिकाटी खरोखरच प्रशंसनीय आहे. यामुळे या संग्रहासारखे आणखी दोन-तीन संग्रहसुद्धा प्रकाशित होण्याइतक्या कविता त्यांनी लिहून ठेवलेल्या आहेत.

मराठीतील अनेक नियतकालिकांतून, दिवाळी अंकातून विशेषांकातून त्यांच्या पुष्कळ कविता प्रकाशित झाल्या आहेत तसेच सोलापूर येथील रवींद्र कवी मंडळासारख्या नवोदित कवींच्या संस्थेचे ते सक्रिय सदस्य आहेत. यामुळे कवी म्हणून त्यांचा परिचय मराठी वाचकांना या आधी झालेला आहेच.

श्री. व्यंकटेश वळसंगकर हे मराठी काव्याच्या कोणत्याच सांप्रदायाचे पायिक दिसत नाहीत. त्यामुळे अमक्या तमक्या ज्येष्ठ श्रेष्ठ कवींचा प्रभाव श्री. वळसंगकरांच्या काव्यरचनेवर पडला आहे असे सांगता येणार नाही. नवकवितेतील कोणत्याच छंदाचा आश्रय न घेण्याची प्रवृत्ती त्यांनी

उचलली आहे असे फार तर म्हणता येईल. पण बाकी सगळे अगदी त्यांचेच आहे. संक्षिप्तता हा भाषेचा आत्मा असे म्हटले जाते. हे सूत्र श्री. वळसंगकर अगदी काटेकोरपणे पाळत असलेले दिसतात. ना शब्दांचे अवडंबर, ना कुठे पाल्हाळ, ना क्लिष्टता. ना नवकवींचा ऊर बडवेपणा, ना क्रांतीच्या उद्गात्याचा आव. त्यांच्या बहुतेक कवितांचा केंद्रबिंदू म्हणजे प्रीतीची भावना. एखादाच शब्द पण भावनेच्या त्या त्या संदर्भात तो मोठा अर्थवाही व आशयघन याचा प्रत्यय या संग्रहातील कविता वाचताना सहज येऊन जातो. 'ती', 'व्रत', 'दुःख', 'आभाळ', 'लेणं' अशा सारख्या कविता सहृदय वाचकांचे एकदम लक्ष वेधून घेण्यास समर्थ आहेत.

या त्यांच्या वैशिष्टयपूर्ण लेखनशैलीमुळे त्यांच्या या पहिल्या प्रकाशनाचे काव्यप्रेमी जनांकडून स्वागत होईल असा विश्वास वाटतो. रसिकांनी दिलेल्या संतोषाच्या पावतीमुळे श्री. वळसंगकरांचा उत्साह द्विगुणित होऊन त्यांच्या अनुभवाच्या कक्षा अधिक विस्ताराण्यात व अधिक समृद्ध व संपन्न काव्यविश्व निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावे ही प्रार्थना !

**–वि. पां. देऊळगांवकर**
अध्यक्ष,
कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद
कार्यालय, गुलबर्गा-५८५१०२

'विश्राम' एस्. बी.
कॉलेज रोड, गुलबर्गा
दि. २२-६-१९८३

# ऋणनिर्देश

●

नियतकालिके / दिवाळी अंक

विशाखा, हिन्दोळ, पारिजात, मंजिरी, सौरभ, चंद्ररूप, रक्तचंदन, मैफल, कोकिळा हौस, तथास्तु, परिसवाद, रंजन, ऋचा, अनुबंध, अमरेंद्र, मयुरेश, लता, मृगजळ, आमराई, लोकवाङ्मय, मायमराठी, मनोरंजन, आक्रोश, प्रेषक, गोदावरी टाईम्स्, सहारा, वीरवाणी, ललितगंध, ख, तितिक्षा, सागर यांनी पूर्व-प्रसिद्धी दिली. या संपादकांचा मी अत्यंत आभारी आहे.

●

व्यक्ती

प्रस्तावना – डॉ. वि. म. कुलकर्णी, पुणे

अभिनंदन – प्रा. वि. पां. देऊळगावकर, गुलबर्गा

संकलन सहाय्य – प्रा. केशव महागांवकर, गुलबर्गा

यांचे बहुमोल मार्गदर्शन व हार्दिक सहकार्य लाभले. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

– व्यंकटेश वळसंगकर

मराठी ...
२५९१
दा. क्र. २५३५
काव्य १५१०।
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# वळणावर

दूऽर त्या वळणावर
उभे रुक्ष असे झाड
पाठीमागे निळसर आकाश
होतो अवकाशाचा भास...
रुक्ष त्या झाडाखाली
एकटीच उभी असशील
पाहून वाट माझी
फारच थकली असशील...
उभी असशील केंव्हाची
नजर बावरलेली घेऊन
उभी झाडाला टेकून
कां – ही ओढ अंतरीची...?
वळणावर येताना
असतेस तूं सामोरी
अन् – दुरून पाहताना
दिसतेस तूं पाठमोरी...

'विशाखा' (पुणे)
सप्टेंबर १९७६

# चांदणी आहेस !

कांही काळे ढग
माझे असतील
बरसणारी धार
तुझी असेल...
एक काळी रात्र
माझी आहे
शुभ्र चांदणं
तुझं असेल...
एक मिणमिणता प्रकाश
माझा आहे
प्रकाश स्रोत
तुझा असू दे...
एक निखळता तारा
मीच आहे
तूं उगवती चांदणी आहेस...

'पारिजात' (पुणे)
दिवाळी १९७७

## गीत

तुझा चंद्र
माझा चंद्र
निळे चांदणे
दोघांचे...

तुझे क्षितिज
माझे क्षितिज
निरभ्र आकाश
दोघांचे...

तुझं मन
माझं मन
जुळली नजर
दोघांची...

तुझे शब्द
माझे शब्द
एकच गीत
दोघांचे...

'मंजिरी' (सांगली)
दिवाळी १९७८

## प्रतीक्षा

तूं माझं नांव अलगद
उच्चारलंस तेंव्हा–
फूल उमलून आल्यासारखं वाटलं...

तूं हंसलीस
मीही हंसलो
अगदी मुक्तछंदातील
काव्यासारखं...

तुझा स्पर्श
गंधित करत होता.
अंग अंग फुलत होतं–
तेंव्हा
पुन्हा एकदा तूं
मुक्तपणे हंसण्याची
वाट पाहत होतो...

'सौरभ' (नागपूर) दिवाळी १९७८

## थेंब

गच्च भरून आलेल्या
आभाळासारखी
आलोस–
आणि
पुन्हा – आभाळ
निवळल्यासारखे
निघून गेलीस–
थेंब होऊन
बरसणारे
अश्रू गळत राहिले...

'चंद्ररूप' (कोल्हापूर)
दिवाळी १९८१

## ज्योत

दुःखाचा वेध
सुखाचा शोध
पाऊलवाट वळून
दूर निघून गेलेली...
रस्त्यावर
एक घर
पावलं तिथेच
थबकलेली...
काळीज-घरात
एक मिणमिण
ज्योत
तुझ्या हाताने सावरलेली...

'रक्तचंदन' (मुंबई)
दिवाळी १९८२

## ' हो ' म्हण....

एकदाच म्हणाली होतीस तूं ' हो '... तेंव्हा–
माझ्यात तो ' हो ' कितीदा घुमला होता...
तूं पारंब्याच्या आड चंद्रासारखी भासलीस
चांदणं धीटाईत तुझ्यासमोर उभं
त्यांकडं तूं तुच्छतेनं पाहिलंस
तूंच चांदणं होतीस
चंद्र होतीस
तारका होतीस...
निळं गगन ठेंगणं होतं तेंव्हा–
' हो ' तर इतकं सुंदर म्हणालीस
मी तेंव्हा नुसतं आकाश बनलो होतो...

' मैफल ' (पणजी) दिवाळी १९८०

## फक्त तूं....

कंठ आहे स्वर आहे
सूर आहे गाणे आहे
दूर आभाळले क्षितिज आहे
पान आहे फूल आहे
पावसात चिंब ऊन आहे
सर झडून गेली आहे
आभाळ तसे निरभ्र आहे
फक्त तूं नाहीस तेंव्हा–
शब्द गळाले गीत आहे...

' अमरेंद्र ' (पुणे) सप्टेंबर १९७९

## पहाट...

तूं काळजी घे
अशी ती की–
तुझ्या हातून
चांदणे,
न निसटेल...
आभाळ ओझे
सहन कर
निघून जाईल
आपोआप
रात्र–प्रहर...
मग
स्वप्नासहितची
पहाट,
सगळी तुझीच...

'कोकिळा' (मुंबई)
दिवाळी १९८०

## 'ती'

ती
साधी
सोज्वळ
सुरूप
मोहक
तिच्या
डोळ्यात–
आभाळाचं पातं
केंव्हाही
लवलेलं असतं
सूर्य उतरताना
चांदणंही
हंसलेलं असतं
तिच्या
स्पर्शात...

'सहारा' (पुणे)
दिवाळी १९८२

## फुले खुडतांना–

फुलें खुडतांना–
तुझ्या नाजूक हातांचा
मुलायम स्पर्श
होईल तेंव्हा–
कळ्या शहारतील...
पाच स्पर्शात
सुखावलेलं फूल
उगीच हंसेलही...
तेंव्हा त्याला
लाजवू नकोस!
तुझीच हास्यकळी
उमलेल
आणि आभाळ–वाऱ्यात
गंधस्पर्शाची
लाट येईल...!

'ललितगंध' (भोर)
दिवाळी १९७९

## कां ?

माझ्या शब्दांचे
लेणे
तुझ्या संगीतात
सजवू कां ?

माझ्या सुरांचे
गाणें
तुझ्या स्वरात
मिळवू कां ?

तूं असशील
चांदणे तर
माझा
अंधार
तुझ्या संगतीत
मालवू कां ?

'हौस' (अहमदनगर)
दिवाळी १९८०

# तुझी आसमंती नजर

तुझी आसमंती नजर
बोलणे धीटाईचे
भुरभुरते केस
डोळ्यांत तारुण्य...
चपखल साडीत
तुझे पाठमोरे सौंदर्य
केसातील गुलाबाचा
मदहोश गंध...
रूपगर्विताच तूं
तुझ्यासाठी माझे काळीज
कळ सोसून
उमलणारे...

'रंजन' (मुंबई) मार्च १९७९

# सुख

सुख असावं
माप भरून
देता-घेता यावं...
आठवण असावी
पुन्हा पुन्हा
ती मोहरून यावी...
तिला उमजावं
मला समजावं
आसावल्या सुखांत
दोघांनी भिजावं...

'तथास्तु' (मुंबई)
दिवाळी १९८०

# एकदा मी–

एकदा मी–
अस्मान मुठीत घेऊन नाचलो.
उल्कांचा वर्षाव होत होता...
एकदा मी–
अगस्ति होऊन
समुद्रदेखील पिऊन गेलो...
एकदा मी–
तुला पाहून
कविता लिहून गेलो,
तूं पाहिलं नाहीस
म्हणून,
शब्द तसेच राहून गेले.
आणि
हंसता हंसताच
कळी होऊन–मी,
सुकून गेलो...

'परिसंवाद' (नासिक) दिवाळी १९७९

# अंधार जगतांना

तूं असतेस
दूरस्थ कोठेतरी,
व्रतस्थ
कोठेतरी...
मी अंधार जगतांना
तूं अफाट चांदणं
कोठेतरी...

'ऋचा' (ठाणे) मार्च १९७८

# आठवण

पाऊस थेंबात
रात्र भिजत
गेली...
स्वर ओलावत
गेले...
हळूशार ओल्या
गारव्यात–
तुझी आठवण
पालवत गेली...

'अनुबंध' (गुलबर्गा)
एप्रिल/जून १९७९

## मागू नकोस ....

तूं तुझा तळहात पसरू नकोस–
माझ्याजवळ चांदणं नाही.
ओंजळ धरू नकोस–
माझ्याजवळ फुले नाहीत.
कांहीच मागू नकोस;
ओसरलेलं आभाळ आहे
शब्द संपलेलं गीत आहे
चांदणं सरून रात्र उरली आहे...

'मयुरेश' (ठाणे) दिवाळी १९८०

## गाण्यातले शब्द

अव्यक्त दुःख
सलत असतं
आठवणी कुठेतरी
रुतून असतात.
अबोल कळी
उदास असते.
गाण्यांतले शब्दही–
विरक्त असतात...

'अनुबंध' ( गुलबर्गा )
जुलै / सप्टें. १९७९

## साथ....

तूं मला अंधारात चालायला
शिकवलंस
दूरच्या प्रकाशाकडं पहायला
शिकवलंस
आभाळातल्या चांदण्यांच्या
कथा ऐकवल्यास
त्यांच्या लुकलुकण्याच्या
तऱ्हा शिकवल्यास
उदासीनतेत
सूरांनी रिझवलंस
गाण्यांनी भुलवलंस
आणि आता
गगनभर चांदणे पसरून
तूंच दूरवर निघून गेलीस
जातांना म्हणालीस-
चांदणं तुझ्या साथीला आहे...

'परिसंवाद' (नासिक)
दिवाळी १९८०

## तूं....

तुझ्याजवळ आभाळ तळं
तळ्यांत चांदण्या
डोळ्यांच्या...
तूं अशी साधी भोळी
आभाळतळी
डोकावणारी...
वारा असा आल्यावर
आभाळ तळं हलल्यावर
मीच हरवले म्हणणारी...

'हिन्दोळ' (जालना)
दिवाळी १९८२

## आभाळ

चालताना
आभाळ
वाकलं...
वारा स्पर्शताच
खळकन्
हसलं...
चालता चालता
आभाळ
थकलं...
कुणाच्यातरी आठवणी-
धार होऊन
बरसलं...

'रंजन' (मुंबई)
जून १९८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९१
दा. क. २०३५४
काव्य १५१५०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## लेणे

ओळख दुरावली
कसले येणे-जाणे
सूर्य कलून गेला
आता फक्त जपून आहे
अंधारात-
तुझ्या सूरांचे लेणे...

'लता' (माजलगाव, बीड)
दिवाळी १९७९

## पांखरं....

तुझ्या
दिठीत
निळं आकाश...
पापणी
हलवूं नकोस,
आकाश निसटेल.
तुझ्या ओठात
सांज गाणी
गाऊ नकोस;
आठवणींची
पांखरं परततील...

'मृगजळ' (पुणे)
दिवाळी १९८०

## चांदणं

नितळ चंद्र
आरशासमोर धर...
तुझा चेहरा उजळेल !
डोळे मिटून घे
चंद्र डोळ्यांत
साठेल !
हलू नकोस...
काळजातलं चांदणं
विरेल...

'आमराई' (रत्नागिरी)
दिवाळी १९८२

## निरोप

फुलांफुलांतून हसूं यावं
तशी तूं हंसलीस
पावसात पान चिबावं
तशी तू बोललीस
सांजवेळी उन्ह परतणीनं आभाळाला
सांगावं–
तसाही तूं निरोप देऊन गेलीस... !

' लोकवाङ्मय ' (मुंबई)
मार्च / एप्रिल १९७९

## कळणार कसे....

तुला आभाळ कळत नाही
तेव्हा आभाळातले अश्रू कळणार कसे...
तुला समुद्र कळत नाही
तेव्हा समुद्राच्या लाटाही कळणार नाहीत.
तुला वादळ-वारा कळत नाही
भिरभिरणारा पाचोळा कळणार नाही.
तुला मी कळत नाही
तेव्हा माझ्यातलं दुःख तरी कळणार कसे...

' परिसंवाद ' (नासिक) दिवाळी १९७८

## सहज....

सहज तुझी आठवण येते
तारकांची रात असते
गर्द पालवीची सळसळ असते
कोवळ्या कळीचे फूल असते
फक्त तुझी चाहूल नसते...
उंच निळे आभाळ असते
आभाळात चांदणे असते
क्षितिज खाली झुकलेले असते...
चांदण्याचे गीत असते
पालवीपालवीत पहुडले असते
हळूच ओठी स्पष्ट होते
तेव्हा सहज तुझी आठवण येते...

'पारिजात' (पुणे)
वासंतिक अंक, मे १९७८

## भावना

अधरांतून
बोल
अंधार थरथरेल!
मंद
हास
पाणी झुळझुळेल!
मौन
धर
भाव उमजेल...!

'कोकिळा' (मुंबई)
दिवाळी १९८२

## चैत्र-वसंत

तूं असं कर
एक एक अक्षर जुळवीत जा
त्यांचे गीत बनेल...
तूं तसंही कर
पापणी घट्ट मिटून बघ
आभाळ खाली आलेलं असेल...
तूं रहा तटस्थ
चैत्र-वसंत
मोहरेल...

'आमराई' (रत्नागिरी)
दिवाळी १९८२

## सोबत

माझ्या सोबतीला अश्रूंनी भरलेलं आभाळ आहे
स्वतःशीच गाणे गावे असे
अश्रूंनी डबडबले गीत आहे
माझेच शब्द, माझेच गाणे
शब्दांतले दुःखही माझेच आहे...

'सौरभ' (नागपूर) दिवाळी १९८०

# येता येणार नाही....

मला आकाश होता येईल
पण–
पांखरू होता येणार नाही.
फक्त
पांखराचे फडफडणे-तडफडणे
तेवढे येईल...
मला गाणे गाता येईल
पण–
सूर लावता येणार नाही.
आळवलेल्या स्वरांत–
माझे स्वर मिसळता येणार नाहीत.
मी दूरच असेन
क्षितिजापर्यंतची माझी नजर–
पण
मला तुझ्याजवळ येता येणार नाही...

'मायमराठी' (बडोदे)
जुलै / ऑगस्ट १९८२

# एक आठवण

एक भिजलेली–
पाऊस आठवण...
सांचलेल्या पाण्यांत
पाय बुडवून पाण्याशी खेळायचीस
पाणी शहारून जायचं
भिजलं अंगण
थरारून जायचं;
पाऊसही तुला भिजवून–
निघून जायचा... तूं
तेंव्हा खूप सुंदर दिसायचीस
मी मात्र शब्द जुळवीत
असायचा...

'सौरभ' (नागपूर)
दिवाळी १९७९

# व्रत

शब्द
मागे ठेवून
गेलीस.
शब्दांना
जपत रहा
एवढेच म्हणालीस.
शब्द
जपण्याचे व्रत
घेतले.
व्रताच्या
समाप्तीला
आलीच नाहीस...

'आक्रोश' (फलटण)
दिवाळी १९८१

## तुझे स्वर....

माझ्या गळ्यातले स्वर केव्हाच
विरलेत.
म्हणून सांगतो आहे
मी थरथरलेला...
माझा गळा दाटून येईल तेव्हा
तुझे सूर मला आळवता येतील.
माझे डोळे भरून येतील तेव्हा
मला तुझे गाणे आठवता येईल.
म्हणून सांगतो आहे
तूं गात रहा...
तुझे गाणे ऐकता येईल.
आभाळ पाणावल असतांना–
तुझे स्वर मला साथ देतील...!

'मैफल' (पणजी)
दिवाळी १९७९

## माझी कविता

माझी कविता
तुझी आहे
तूं असतानाच
फुलली आहे
शब्द न् शब्द
तुझा आहे
मी लिहिताना– फक्त,
अश्रुतून–
ओघळली आहे...

'कोकिळा' (मुंबई)
दिवाळी १९८१

## वेदना

प्रतीक्षेतच तुझ्या किती रहावे
तुझ्यापासून–
दूर... दूर...
उजाड उनासारखे
भकास
उसासे टाकत.
आभाळागत
उंचावलेली आशा...
मनात रुजवत.
तुझ्या पावलांनाही
कळत नसेल
त्यांची दिशा...
हेच तर दुःख
माझ्यात आहे...
तुला कळत असूनही–
तूं येणार नाहीस
ही वेदना तीव्र आहे...

'मनोरंजन' (सांगली)
दिवाळी १९८१

## चालतांना–

चालतांना
तूं अडखळतेस म्हणून
मी तुझा हात
घट्ट धरतोय;
तुला सावरण्यासाठी...
आणि चालतांना
तूं माझा हात
सोडतेस तेंव्हा–
मला सावरण्यासाठी म्हणून
माझे हात
अपुरे आहेत...

'मैफल' (पणजी)
ऑगस्ट १९७९

## साथ

मनातली व्यथा
मनात ठेवावी
समोर स्मृतींचे
पिंजारलेले आभाळ
असू द्यावे.
एखाद्याने भैरवी
म्हटली तर–
आपण त्याची
साथ करावी
आपल्याच भैरवीने...

'आमराई' (रत्नागिरी)
दिवाळी १९८१

## लाईफ

रिकाम्या पोटीचे श्वास–
अगदी कंपलसरिली घेतोय,
ते घ्यावेच लागतात म्हणून.
उद्याच्या भविष्यावरचा–
माझा विश्वास ऑफ झालाय.
माझी उगीच जगण्याची धडपड–
अगदी वेऽऽस्ट वाटतेय
माझं मन बोल्ड झालंय.
माझं लाईफही वेऽस्ट झाल्यासारखे...

'अनुबंध' (गुलबर्गा)
ऑक्टो. / डिसेंबर १९७७

## कविता

इथे सारेच आमचे आहे म्हणत असताना
आमचे असे काहीच नसते
गगनभर चांदण्या पेरल्यानंतरही
चंद्र आमचा असत नाही
चांदणे आमचे असत नाही...
लाख सूर्य तेज पाजळताना
अंगातून धार निखळताना
गळाभरचं दुःख पुसून टाकता येत नाही...

'लोकवाङ्मय' (मुंबई)
मार्च / एप्रिल १९७९

## क्षितिज

कांही सुखाची पावलं
केव्हा निराशेची चाहूल
आपले गाणे आपणच गायचे
आपले दुःख आपणच विसरायचे
स्वप्नीच्या चांदण्यात स्वतःला हरवून-
कुणाचे शब्द आठवायचे
कुणाचे शब्द साठवायचे
आपल्या शब्दांचा अर्थ लावत
सारे क्षितिज संपवायचे...

'सहारा' (पुणे) दिवाळी १९८१

## शब्द थांबले....

ही पहा मी कविता लिहिली
शब्द जुळवले
चांदणे सजवले
शब्दांना अर्थ दिला...
वाटले, तुलाही चार ओळी सांगाव्यात
पण, काय ?
चांदणे ढगाआड गेले
तेव्हा वाचता वाचता शब्द थांबले...

'अमरेंद्र' (पुणे) फेब्रुवारी १९८३

## ओझे

सारेच कसे ओझ्यासारखे
आयुष्यदेखील...
वाट – वेडीवाकडी
पाऊल – आडवेतिडवे
आभाळ – ढगाळलेले
सूर्य – अस्तावलेला
फुलें – कोमेजलेली
सांज – हरवलेली
पाऊस – कोसळलेला
आणि जीवन – असेच वाढत गेलेले...

'तथास्तु' (मुंबई) दिवाळी १९७९

## प्रतिमा

मी आकाशाची
निळाई शोधताना
सागराची गहराई
गाठतो.
मी सुखाची
लकेर शोधताना
दुःखाची सीमा
गाठतो.
मी तुला
शोधताना केवळ
तुझी प्रतिमा
गाठतो....

' रंजन ' (मुंबई)
एप्रिल १९७९

## दुःख

कडा
केव्हा भिजल्या
कळले नाही.
अश्रू
केव्हा गळले
समजले नाही.
दुःख
अनुभवतांना
सावरता आले नाही...

' प्रेषक ' (पुणे)
दिवाळी १९८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५११
क्र. क्र. २२३७५
काळ ५५१०१८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## वाटा

भरला ऊर
चांदणे टिपूर
आठवणी गोळा
झालेल्या...
रिते मन
निःशब्द शब्द
चांदण्याच्या वाटा
उदासलेल्या...

'गोदावरी टाईम्स' (नांदेड)
दिवाळी १९८०

## पावलांना–

इजा कशा होतात
कोणाला कळत नाही
अश्रू कसे ओघळतात
मनाला कळत नाही
रस्ते कोठे संपताच
पावलांना कळत नाही...

'प्रेषक' (पुणे)
दिवाळी १९८२

# व्रतस्थ

आकाशातले
गळाले
सूर्यतेज वाहतो आहे
तटस्थ.
पांढरा सूर्यच आता
डोक्यावर
माझा मेंदू खातो आहे
त्याची भूक भागते आहे
म्हणून
माझ्यातला ' माणूस '—
शांत
व्रतस्थ...

' वीरवाणी ' (बेळगाव)
दिवाळी १९८१

# चित्रे

मरण-दुःखाच्या
यातना
जगताना होतात.
अश्रूंत
भिजलेली दुःखे
सवयीची होतात.
पापण्यांत
अंधार दाटतो
म्हणून
डोळ्यांची उघडझाप
होते.
आणि समोर पुन्हा–
अंधाराचीच
चित्रे
दिसू लागतात...

'अमरेंद्र' (पुणे)
दिवाळी १९७८

# कळायचं आहे

मी काळोख पिऊन
काळोख
जगतो आहे...
पसरत असलेला
काळोख
माझाच आहे...
काळोख
अंगावरून
जातो आहे
नि पुन्हा–
गुंताळतो आहे
काळोख
संपणार केंव्हा... ?
मला
अजून–
कळायचं आहे–...

'रंजन' (मुंबई)
जानेवारी १९७९

# घात

पांखरूं गुंतून पडलंय
फडफडत फडफडत
झाडाच्या उबेत.
त्याला उडता येईल ?
त्याचे दुःख
त्याच्या पंखांचे दुःख
त्याचे आकाशाला काय ?
त्याचे अव्याहत चालणाऱ्या-
जगाला काय ?
झाडांतील उबेनंच
त्याचा घात केला आहे...

'ख' (मुंबई)
मार्च / एप्रिल १९८१

# रात्र

मला आता कांहीच सुचत नाही म्हणून
आकाशांत
आकाश चांदण्यासमवेत धुमकेतूचा एक लांब
रेघोटा मारतोय.
चंद्रालादेखील मीच राहू-केतू होऊन
ग्रासायला प्रारंभ केलाय.
तेव्हा माझ्याकडे बघणाऱ्यांच्या नजरा
आणि त्यांचे चेहरे
काळेठिक्कर दिसताहेत...
मग चंद्राच्या पाऊल खुणा पुसत येणारी
अमावस्येची कभिन्न रात्र
तिचाच मुक्काम आता वस्तीवर वाढत आहे...

'मायमराठी' (बडोदे)
फेब्रुवारी १९८१

# ओघळणारे अश्रू

मी सुखी असतो तर–
तुझ्या असह्य दुःखाचे ओझे
हंसत हंसत साहवले असते...
आता मला ' नाही रे ' म्हणताना–
' होय 'ही म्हणवत नाही.
तुझ्या दुःखाने तुझा पाठीचा कणा मोडल्यासारखा
मला स्वतःचा असूनदेखील
तुला देता येत नाही.
तुझे गळून गेले खूपसे अश्रू
धरण्यासाठी माझे हात कांपतात...
पण... त्यांना माझे करता येत नाहीत.
माझ्या विशाल डोळ्यांच्या कवेत घेता येत नाहीत.
कारण–
माझ्याजवळही ओघळणारे अश्रू आहेत...

' तितिक्षा ' (पुणे) ऑक्टो. / डिसें. १९८०

# जीवन तुझे ....

शरीर झिजतं
मन कष्टतं
जीवन तुझं
गंधरूप असतं...
अश्रू झरतात
मेघ वर्षतात
जीवन तुझं
तृप्त असतं... ...
सुख दुःखी
बाह्यांतरी
जीवन तुझं
कृतार्थ असतं...

'तितिक्षा' (पुणे)
ऑक्टो / डिसें. १९८२

# जगणे

कुठे खाचा
कुठे खळगे
चालणाऱ्याच्या
रस्त्यावर...
कुठे शिंप
कुठे मोती
खळाळणाऱ्या
लाटांवर...
कुठे वारा
कुठे ऊन
जगणाऱ्याच्या
माथ्यावर...

'अमरेंद्र' (पुणे)
दिवाळी १९८०

# प्रतिक्रिया

माझे मन
माझेच
माझ्या जगण्यावर
अधिकार
माझाच
भोगण्याचे
कठिण व्रत
माझेच
मी जगतोय
पोटासाठी
माझ्याच;
तेव्हा मला तुम्ही–
खुशाल क्षुद्र ठरवूं शकता...

'मायमराठी' (बडोदे)
मार्च १९८१

# आम्ही– १.

वैफल्यात आशावाद
उरी-पोटी बाळगणारे
आम्ही...
हीच आमची ट्रॅजिडी
आमच्यात रुजलेली आहे.

●

एकमेकांवर चाललेली
कुरघोडी
प्राणघातक कृत्ये–
जीवघेणा व्यभिचार
रस्तोरस्ती...
परावलंबित्व !
आणि 'माणुसकी'
पारतंत्र्यात गंजल्यासारखी.
पुन्हा व्यक्तिस्वातंत्र्य
गमावल्यासारखे...
'ज्ञाताचे कुंपण' आम्हाला अजून–
लांबच आहे.
फक्त,
आम्ही म्हणत असूं–
'केशवसुत गाऊनि गेले...'

●

आम्ही !
प्रकाशाचा शोध घेत
अज्ञाताच्या अंधारात चांचपडणारे
परंपरेच्या 'दुर्दम्यरुढी'तच
लोळत राहणारे...

'मायमराठी' (मुंबई)
दिवाळी १९७४
काव्यस्पर्धा पुरस्कार

# आम्ही- २.

आम्ही-
'अ' पासून 'क्ष- ज्ञ' पर्यंतच्या
नांवाची अख्खी माणसं
चक्क एक्स्पलॉयटेड अशी...
म्हणतात ना-
वन्स एक्स्प्लॉयटेड्...
एव्हर एक्स्टलॉयटेड्...
अरे दम खायचा
तरी
दमच नाहीय...
सारे जग बुडाले !
आम्हांलाही त्याची कदर नाहीय.
आम्ही तरी-
थोडेच उरणार आहोत... ?

'मैफल' (पणजी)
एप्रिल १९८०

# चांदणं

एक चांदणी रात्र त्याच्यावर कोणताच परिणाम करत नाही.
तो खुशाल हात विशाल पसरून भीक मागत असतो.
चांदण्याचं सुख फक्त कवींनी घ्यावं
आणि मदहोश होऊन शब्दांत रंगून जावं
एवढंच.
सौंदर्याचे स्तुतिपाठ गाणारे सौंदर्यवादी कवी
चांदण्याला कवटाळत असतात...
मग—
त्याच्या उघडचा थाळीतलं पांढरं चांदणं उदास कां असतं ?
ते कुणी सांगावं...

' मायमराठी ' (मुंबई) दिवाळी अंक १९७८
काव्यस्पर्धा तृतीय पारितोषिक

# समाधान

रात्र अन् दिवसाची ऊन सावली माझ्या अंगावरून
जातेय.
माझ्यात 'असले 'पणाची जाणीव केव्हाच–
विरून गेलीय.
नुस्ता पाषाणांत देव पाहतोय–
दिसतो का म्हणून...
आता मी ' संपले 'पणा बघतोय
अनुभवतोय.
मनाची कबर मीच बांधून तयार केलीय
दगडविटांनी
'पुरल्या 'ची जाणीव असतांनाच होतेय.
'अनोळखी ' काळाची तजवीज करून ठेवल्याचं–
समाधान तेवढं अनुभवतोय.

' रवींद्र कवी मंडळ ' सोलापूर आयोजित
कविवर्य तांबे जन्मशताब्दी काव्यस्पर्धेचे
पहिले तांबे पारितोषिक (१९७५)

# हे शहर....

शहराचा आत्मा भेदत जाणारे रस्ते
आणि शहर हे असं तटस्थ.
तरीहि आपल्या रस्त्यांचं सौंदर्य अभिमानपूर्वक कथणारं
हे शहर...
आपल्या माणसांच्या देहांचं ओझं पेलणारं
हे शहर...
या माणसांनीच कुरूप होत जाणारं
हे शहर...
तरीहि शहर हे असं तटस्थ.
मी या माणसांतला
माझ्या दुःखांच्या आत्मनिवेदनात रंगलेला,
हे शहर असं तटस्थच...

' आकंठ ' (मुंबई) दिवाळी अंक १९८२ काव्यस्पर्धा
उल्लेखनीय कविता

## पाझर....

माणसानं व्हावं आभाळ
आपल्या हातांचे हार गुंफावेत
उरातली जखम उरीच जपावी
दुःख वाहणाऱ्यांसाठी–
फुलेंही उधळावीत...
आपल्याच शब्दांत गाणं गावं
पाऊस-थेंब होऊन बरसत रहावं
दुःख ओसरण्यासाठी– कळा सोसताना
मायेचे पाझर फुटू द्यावेत...

'तितिक्षा' (पुणे)
एप्रिल/जून १९८१

# सुख

दूर गेल्यावर
पुनः परतायचे
नसते कां ?
सूर आळवल्यावर
गाणे गायचे
नसते कां ?
लिहून झाल्यावर
शब्द आठवायचे
नसतात कां ?
गाळून झाल्यावर
अश्रू गिळायचे
नसतात कां ?
दुःख संपल्यावर
सुख येणारच
नसते कां ?

'भरारी' (मुंबई)
जून १९८२

## निखारे....

उनाने पेटवायचे ते
मनाने पेटवले.
पावसांनी विझवायचे ते
अश्रूंनी विझवायचे ठरवले.
पायाखालील रस्ते
सपवता संपवता
दिवसच निखारे झाले...

'अनुबंध' (गुलबर्गा)
ऑक्टो. / डिसें. १९८२

# सावज

दूर स्वप्नाकाश
इथे एक
सुस्त काळोख...
चांदणं प्यायच्या इर्ष्येत
मी होतोय
एक पारधी...
सावज शोधताना
सावज दूर
मी स्वप्नस्थ...

'अनुबंध' (गुलबर्गा)
ऑक्टो. / डिसें. १९८२

# मी ....

काही पेलवण्यासारखा
मी डरत नाही...
अशीही माणसं भेटली
स्वतःच बोंब ठोकणारी
त्यांच्या निर्लज्जपणाचे त्यांना काहीच नाही
ती उंच झाडावर घुबडांसारखी बसलेली
आभाळ त्यांना चार बोटंच उरलेलं
मी मात्र स्वान्तसुखाय जमिनीवरून चाललेला...

'तथास्तु' (मुंबई) दिवाळी १९८२

• • •

# मीच

माझ्यासमोर–
सूर्यालाही पाय पोटात घेऊन
थंड गोळा व्हावं लागलं...
कारण
माझ्या पोटातली
भूक इतकी होती की–
तेव्हा पोट तापलं होतं.
मीच तापलेल्या डोळ्यांतून
ऊन ओकत होतो...

'सागर' (पणजी)
दिवाळी १९७९

REFBK-0024345
REFBK-0024345

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९९
दा. क्र. २८.३.७५
काव्य ९१५७७
शाखा (स्थळ प्रत)